# L. A. BILL No. XXXVII OF 2021.

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STAMP ACT.

## सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७.

**महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**(विधानसभेने दिनांक २७ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.)**

**(विधानपरिषदेने दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी शिफारशींशिवाय परत केल्याप्रमाणे.)**

१९५८ चा ६०.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** या अधिनियमास, महाराष्ट्र मुद्रांक (सुधारणा) अधिनियम, २०२१, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन १९५८ चा अधिनियम क्रमांक ६० याच्या अनुसूची एक ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमास जोडलेल्या अनुसूची एक मध्ये,— १९५८ चा ६०.

(१) अनुच्छेद ६ मध्ये,—

(क) खंड (१) मधील, उप-खंड (ब) च्या, स्तंभ (२) मध्ये,—

(एक) " दहा लाख रुपयांच्या " या मजकुराऐवजी, " वीस लाख रुपयांच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन ) पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

" परंतु, बँकांच्या व्यापारी संघाच्या नावाने निष्पादित केलेल्या लेखांच्याबाबतीत आकारणी योग्य शुल्क, पन्नास लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल. " ;

(ख) खंड (२) मधील, उप-खंड (ब) च्या स्तंभ (२) मध्ये,—

(एक) " दहा लाख रुपयांच्या " या मजकुराऐवजी, " वीस लाख रुपयांच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन ) पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

" परंतु, बँकांच्या व्यापारी संघाच्या नावाने निष्पादित केलेल्या लेखांच्याबाबतीत आकारणी योग्य शुल्क, पन्नास लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल. " ;

(२) अनुच्छेद ३३ मधील, खंड (ब) च्या उप-खंड (दोन) ऐवजी, पुढील उप-खंड दाखल करण्यात येईल :—

" (दोन) जर याप्रमाणे कब्जा दिलेला नसेल तर,—

| | |
|---|---|
| (अ) जर अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या अधिक प्रभाराची रक्कम पाच लाख रुपयापेक्षा अधिक नसेल तर, | किमान शंभर रुपयांच्या अधीनतेने, अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या अधिक आकाराच्या रकमेच्या ०.१ टक्के ; |
| (ब) इतर कोणत्याही बाबतीत, | कमाल वीस लाख रुपयांच्या अधीनतेने, अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या अधिक आकाराच्या रकमेच्या ०.३ टक्के. " ; |

(३) अनुच्छेद ४० मधील, खंड (ब) मधील, उप-खंड (दोन) च्या स्तंभ (२) मध्ये,—

(एक) " दहा लाख रुपयांच्या " या मजकुराऐवजी, " वीस लाख रुपयांच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन ) पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

" परंतु, बँकांच्या व्यापारी संघाच्या नावाने निष्पादित केलेल्या लेखांच्याबाबतीत आकारणी-योग्य शुल्क, पन्नास लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल. " ;

(४) अनुच्छेद ४१ ऐवजी, पुढील अनुच्छेद दाखल करण्यात येईल :—

" **४१. पिकाचे गहाणखत,** एखाद्या पिकाच्या कोणत्याही गहाणावर-मग गहाणाच्या वेळी पीक अस्तित्वात असो किंवा नसो,- दिलेल्या कर्जाची परतफेड प्रतिभूत करण्यासाठी केलेल्या कराराचा पुरावा असणारा कोणताही लेख यांसह,–

| | |
|---|---|
| (एक) अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेली रक्कम पाच लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल तर, | किमान शंभर रुपयांच्या अधीनतेने, अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या ०.१ टक्के ; |
| (दोन) इतर कोणत्याही बाबतीत, | कमाल वीस लाख रुपयांच्या अधीनतेने, अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या ०.३ टक्के." ; |

(५) अनुच्छेद ५४ ऐवजी, पुढील अनुच्छेद दाखल करण्यात येईल :—

"**५४. प्रतिभूती - बंधपत्र किंवा गहाणखत,**

जेव्हा असे प्रतिभूती - बंधपत्र किंवा गहाणखत, एखाद्या पदाचे यथोचित कार्य करण्यासाठी प्रतिभूती म्हणून अथवा त्या पदाच्या नात्याने मिळालेला पैसा किंवा इतर मालमत्ता यांचा हिशेब देण्याकरिता अथवा एखाद्या कराराचे यथोचित पालन करण्याची हमी म्हणून एखाद्या जामीनदाराने अथवा न्यायालयाच्या किंवा सरकारी अधिकाऱ्याच्या आदेशास अनुसरून निष्पादित करून दिलेले
१९५९ चा ३६.. असेल, परंतु महाराष्ट्र न्यायालय-शुल्क अधिनियमाद्वारे अन्यथा तरतूद केलेले नसेल तेव्हा,—

| | |
|---|---|
| (एक) जर अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेली रक्कम पाच लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल तर, | किमान शंभर रुपयांच्या अधीनतेने, अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या ०.१ टक्के ; |
| (दोन) इतर कोणत्याही बाबतीत, | कमाल वीस लाख रुपयांच्या अधीनतेने, अशा विलेखाद्वारे प्रतिभूत केलेल्या रकमेच्या ०.३ टक्के. : परंतु, जेव्हा जिच्यासाठी एखादी व्यक्ती जामीन राहते आणि प्रतिभूती बंधपत्र किंवा गहाणखत करून देते अशा व्यक्तीने निष्पादित केलेल्या लेखावर, अनुच्छेद ४० अन्वये शुल्क प्रदान करण्यात आले असेल तर, प्रदेय असलेले शुल्क शंभर रुपये इतके असेल.". |

(शा.म.मु.)एचबी १८५९—२ (५००-१२-२०२१)

**सूट**

बंधपत्र किंवा अन्य लेख जेव्हा,—

(अ) धर्मार्थ दवाखाना किंवा रुग्णालय किंवा सार्वजनिक उपयुक्ततेचे इतर कोणतेही उद्दिष्ट यासाठी खाजगी वर्गणीतून प्राप्त झालेले स्थानिक उत्पन्न, दरमहा विनिर्दिष्ट रकमेपेक्षा कमी असणार नाही अशी हमी देण्याच्या प्रयोजनार्थ कोणत्याही व्यक्तीने ;

(ब) महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम, १९७६ याच्या कलम ११४ अन्वये राज्य शासनाने केलेल्या नियमांन्वये; १९७६ चा महा. २८.

(क) जमीन सुधारणा कर्जे अधिनियम, १८८३ किंवा शेतकरी कर्ज अधिनियम, १८८४ यांअन्वये आगाऊ रकमा घेणाऱ्या व्यक्तींनी किंवा त्यांच्या जामीनदारांनी अशा आगाऊ रकमांच्या परतफेडीची प्रतिभूती म्हणून ; १८८३ चा १९. १८८४ चा १२.

(ड) एखाद्या पदाचे यथोचित कार्य करण्यासाठी किंवा त्या पदाच्या नात्याने मिळालेला पैसा किंवा इतर मालमत्ता यांचा हिशेब देण्यासाठी प्रतिभूती म्हणून शासकीय अधिकाऱ्यांनी किंवा त्यांच्या जामीनदारांनी,

निष्पादित करून दिलेला असेल तेव्हा.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[ सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३७.]**

**[महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. बाळासाहेब थोरात,**
महसूल मंत्री.**]**

**[विधानसभेने दिनांक २७ डिसेंबर २०२१ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[विधानपरिषदेने दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी शिफारशींशिवाय परत केल्याप्रमाणे.]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई